आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय, कुळगाव बदलापूर

## अहवाल

<u>शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन</u> *(Career Guidance)* <u>: परिसंवाद</u> *(Seminar)*

दि. *१७ सप्टेंबर* २०२२ रोजी, जागतीक विश्वबंधुत्व दिनाचे औचित्य साधून *INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)* आणि *मराठी भाषा व वाङ्मय मंडळ* यांच्या संयोगाने *उद्योजक मा. गोविंदजी ओझा (Director, Business Development at Pari Robotics)* यांना विशेष करियर मार्गदर्शनाकरीता आमंत्रित केले होते. विद्यार्थ्यांना रोजगाराच्या आणि व्यवसायाच्या नवनवीन वाटांविषयी अवगत करून देणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते.

निवेदक प्राध्यापक संदीप भेले यांनी व्यासपीठावरील सर्व पाहुण्यांना दीप प्रज्वलनाची विनंती केली. त्यानंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी व प्राध्यापक प्रशिक सोनवणे यांनी संवादिनीची साथ देऊन ईशस्तवन सादर केले, अश्याप्रकारे शारदा देवीला वंदन करून कार्यक्रमाची शुभ सुरुवात करण्यात आली.

व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचे *शाल, श्रीफळ व तुळशीचे रोप* देऊन स्वागत करण्यात आले यांमध्ये प्रमुख अतिथि उद्योजक मा. गोविंदजी ओझा त्यांच्या सहचारिणी सौ. ओझा, आ. वि. प्र. संस्थेचे सहसचिव मा. पंढरीनाथ बावीस्कर, आ. वि. प्र. संस्थेचे खजिनदार मा.तुषार आपटे आणि आदर्श महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मा. संगीता पांडे यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाची प्रस्तावना आदर्श महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संगीता पांडे यांनी केली. २१ व्या शतकातील ‚उद्योजक क्षेत्राकडील“ तरुणांचा कल बघता भविष्यात रोजगार मागण्या ऐवजी रोजगार निर्मिती करणारा तरुण निर्माण व्हावा हे ध्येय आपण डोळ्यां समोर ठेवून जगले पाहिजे असा संदेश दिला.

प्राध्यापिका सौ. दक्षा हलकारे यांनी अतिथिंची विशेष ओळख सभागृहाला करून दिली. *PARI Robotics* ही १२०० कोटी दारडोई उत्पन्न असलेली जागतिक कीर्तीची कंपनी. या कंपनीला मोठे करणारे मा. गोविंदजी ओझा यांची सभागृहाला थोडक्यात ओळख करून दिली.

यानंतर कार्यक्रमाची धुरा प्रमुख पाहुणे मा. गोविंदजी ओझा यांनी सांभाळली. त्यांनी त्यांच्या बालपणा पासून ते एका जागतीक दर्जाच्या कंपनीच्या संचालक बनण्यापर्यंतचा रोमांचक प्रवास विद्यार्थ्यां समोर मांडला. या प्रवासात आलेल्या अडचणी ज्यामध्ये इंग्रजी भाषेची अडचण त्यांनी विशेष करून मांडली. मराठी विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा वापर कशाप्रकारे संवाद सादण्याकरिता करावा व इंग्रजी विषयीची आपली भीती घालवावी याची स्व-अनुभवातील घटनांद्वारे प्रचिती दिली.

२ तास विद्यार्थ्यांनी अतिशय रंजक रित्या या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. पाहुण्यांच्या भाषणानंतर व्यासपीठावरील मान्यवर संस्थेचे.सहसचिव मा. पंढरीनाथ बावीस्कर यांनी थोडक्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर आ.वि.प्र. संस्थेचे खजिनदार मा.तुषार आपटे यांनी देखील मोजक्या शब्दां मध्ये स्वामी विवेकानंद व करीयरच्या नवीन वाटा या विषयी मार्गदर्शन केले.

बदलापूर विवेकानंद केंद्राच्या अध्यक्षा मा. मीनाताई देशपांडे यांनी “स्वामी विवेकानंदांचे न्यूयॉर्क मध्ये गाजलेले ११ सेप्टेंबर १८९३ रोजीच्या भाषणाचे महत्व“ सभागृहा समोर मांडले.

प्राध्यापक प्रशिक सोनवणे यांनी समारोप करीत व्यासपीठावरील मान्यवर, शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग तसेच कार्यक्रमातील उपस्थित सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी विवेकानंद केंद्राची प्रार्थना घेत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

तारीख : १७ सप्टेंबर २०२२